दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक १७३ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शुक्रवार, दि.१२ सप्टेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

# पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये होणार दैनिक बाजार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती - अ(खारघर), ब (कळंबोली),क (कामोठे) , ड( खारघर) मधील विविध भुखंडांवर दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सिडको प्राधिकरणाकडुन दैनिक बाजार बांधकामाकरीता भूखंड उपलब्ध झाले आहे. सदर भुखंडांवर बऱ्याच काळापासून तात्पुरत्या बांधकामासह बाजारपेठा सुरु आहेत. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार याठिकाणी नव्याने कायम स्वरुपी बांधकाम करुन दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित आहे. ज्यामुळे नागरिकांना बाजारांची चांगली व सहजपणे व सोयीस्कर सुविधा उपलब्ध होणार आहे.

खारघर प्रभाग अ मध्ये सेक्टर ३,४,६,११,१२,१५ व २० मधील एकुण १५ ठिकाणी गरजेनूसार विविध ओटेसंख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहे. या दैनिक बाजारांसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देखील मिळाली आहे. येत्या काही दिवसांमध्ये हे काम पूर्ण होऊन नागरिकांच्या सेवेत प्रशस्त, रेखीव असे दैनिक बाजार उपलब्ध होणार आहेत.

कळंबोली प्रभाग ब मध्ये सेक्टर २,२ई, ५ई, ६, १०,१२, १४,१५ मध्ये १६ ठिकाणी गरजेनूसार ओटेसंख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहे. या दैनिक बाजारांसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देखील मिळाली आहे. येत्या काही दिवसांमध्ये हे काम पूर्ण होऊन कळंबोली प्रभागातील नागरिकांच्या सेवेत सुव्यवस्थित प्रशस्त असे दैनिक बाजार उपलब्ध होणार आहेत.

कामोठे प्रभाग समिती क मध्ये सेक्टर १७मध्ये ३८ ओटे , सेक्टर २१ मध्ये १४ ओटे, सेक्टर १८मध्ये ४६ ओटे , सेक्टर १०मध्ये १४ ओटे अशा पाच ठिकाणी दैनिक बाजार बांधण्यात येणार आहेत. या दैनिक बाजारांसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देखील मिळाली आहे. येत्या काही दिवसांमध्ये हे काम पूर्ण होऊन कामोठे प्रभागातील नागरिकांच्या सेवेत प्रशस्त असे दैनिक बाजार उपलब्ध होणार आहेत.

पनवेल प्रभाग ड मध्ये सेक्टर ६, १एसई, २ ई, ३ ई, ४ई, ७ डब्लू,८डब्लू, १० डब्लू.५ए, ५ मधील १० ठिकाणी गरजेनूसार ओटेसंख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहे. या दैनिक बाजारांसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देखील मिळाली आहे. येत्या काही दिवसांमध्ये हे काम पूर्ण होऊन पनवेल प्रभागातील नागरिकांच्या सेवेत सर्व सोयी सुविधांनी युक्त असे प्रशस्त असे दैनिक बाजार उपलब्ध होणार आहेत.

## शासनाच्या सर्व सेवा व योजनांचे लाभ 'आपले सरकार' संकेतस्थळावर मिळावेत : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नागरिकांना सर्व शासकीय सेवा व योजनांचा लाभ 'आपले सरकार ' संकेतस्थळावरुन मिळावा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी येथे दिल्या. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन नागरिकांना सुलभ पद्धतीने लाभ देण्याचा शासनाचा मानस असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले. सुशासनामध्ये सुधारणा करुन ' इज ऑफ लिव्हींग ' च्या दृष्टीने ' आपले सरकार ' संकेतस्थळ टप्पा दोन हे दोन ऑक्टोबरपर्यंत कार्यान्वित करावे, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

या सेवांसंदर्भात शासनाने 'समग्र' संस्थेशी करार केला आहे. शासकीय सेवा व योजनांचे आपले सरकार संकेतस्थळावर एकत्रीकरण करण्यासंदर्भात फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक घेतली. त्यावेळी सर्व विभागांची संकेतस्थळे किंवा पचे एकत्रीकरण करावे, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या. या बैठकीस माहिती व तंत्रज्ञान मंत्री ड आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश कुमार, राज्यसेवा हक्क हमी आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव आदी उपस्थित होते.

राज्यातील प्रत्येक नागरिकाला शासकीय योजनांचा लाभ व सेवा कमीत कमी कालावधीत आणि विनासायास मिळावा, यादृष्टीने नागरिक केंद्रीत दृष्टीकोनातून ' आपले सरकार (टप्पा २) ' संकेतस्थळ विकसित करावे. या संकेतस्थळावर शासनाच्या सर्व सेवा नागरिकांना टप्प्याटप्प्याने उपलब्ध होणार आहे. यादृष्टीने २६ नोव्हेंबर (संविधान दिन), २६ जानेवारी २०२६ (प्रजासत्ताक दिन) आणि १ मे २०२६ (महाराष्ट्र दिन) अशा तीन टप्प्यातील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना फडणवीस यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या.

## संक्षिप्त...

### राज्यात रविवारपासून सक्रिय होणारा पाऊस सरासरीपेक्षा जास्त असण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

संपूर्ण राज्यात रविवारपासून पाऊस सक्रिय होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान, रविवारीपासून पुढील दोन आठवडे पडणारा पाऊस हा सरासरीपेक्षा जास्त असण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यानुसार काही भागात सर्वाधिक पाऊस नोंदला जाण्याचा अंदाज आहे.

मुंबईसह राज्यातील इतर भागात सोमवारपासून फारसा पाऊस पडलेला नाही. काही भागात हलक्या सरी बरसल्या. मात्र, मुसळधार पाऊस पडलेला नाही. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजनुसार रविवारपासून संपूर्ण राज्यात पाऊस सक्रिय होणार आहे. दरम्यान, या कालावधीत नैऋत्य मोसमी वारे पुन्हा सक्रिय होणार आहेत. तसेच एक चक्रीय स्थिती बंगालच्या उपसागरात निर्माण होणार आहे. परिणामी, राज्यात सर्वदूर सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे.

### पोलादपूरनजिक भोगाव भुयारीमार्गाजवळ

## इको कारची संरक्षण भिंतीला धडक; एक ठार ५ जखमी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर तालुक्यातील भुयारी मार्गाकडे जाणाऱ्या मुंबई गोवा महामार्गावरील मुंबई बाजूकडून गोवा दिशेने जाणाऱ्या इको कारने संरक्षक भिंतीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात कार कलंडून एक प्रवासी ठार तर अन्य पाच जण जखमी झाले. गुरूवारी पहाटे सव्वातीन वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. मृतासह अन्य पाच जखमी प्रवासी पुणे जिल्ह्यातील रहिवासी असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

मुंबई बाजू कडून गोवा दिशेने जात असताना इको कार चालक लिंगप्पा कटप्पा पातारे (वय २८रा. निगडी पुणे) हा त्याच्या ताब्यातील इको कार (क्र.एमएच१४ केएस०२३१) घेऊन भोगाव हद्दीत भरधाव वेगाने जात असताना त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले. यामुळे भोगाव पुलावरील कठडयावर कारने जोराने धडक दिली आणि कार कलंडून झालेल्या अपघातात १ ठार तर ५ जखमी झाले. या अपघातात अनिल देविदास कांबळे (वय ५५ रा.चहोली ता. हवेली जि. पुणे) याचा जागीच मृत्यू झाला तर धनराज प्रभाकर मगर (वय ४२), विकास शंकर चव्हाण (वय १८), मोहन गोरोबा चव्हाण (वय ४२), नागनाथ मल्लिकार्जुन कांबळे (वय ३५), वाहनचालक निंगप्पा कंटप्पा पातारे (वय २८) हे सर्व जखमी पुणे जिल्ह्यातील रहिवासी आहेत. यापैकी गंभीर दुखापत झालेल्या तिघांना खेड तालुक्यातील कळंबणी येथील रत्नागिरी उपजिल्हा रुग्णालय येथे उपचार करण्यात आले तर दोन किरकोळ जखमी प्रवाशांवर पोलादपूर ग्रामीण रुग्णालय येथे उपचार करण्यात आले.

या अपघाताचे वृत्त समजताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार रवींद्र सर्णेकर, ठाणे अंमलदार सतीश



कदम, पो. ह. नितेश कोंढाळकर यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून जखमींना तातडीने उपचारासाठी पाठविले. यासह कशेडी पोलीस मदत केंद्राचे पीएसआय गीमवणेकर, हेकॉ. माजलकर, चाटे व सोडमीस यांनीही घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत केली. पोलादपूर पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद रजि. ५१२०२५ भा.न्या.स. कलम १०६(१),२८१,१२५(अ),१२५(ब) मोटार वाहन कायदा कलम १४८ प्रमाणे नोंद करण्यात आली असून या अपघातप्रकरणी अधिक तपास ठाणे अंमलदार सतीश कदम हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## 'आमची आझाद मैदानावर फसवणूक', मराठा वकील योगेश केदार यांची भूमिका

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत नवा जीआर काढला आहे. पण या नव्या जीआरवर मराठा समाजाच्या काही मंडळींचा विश्वास नाही. त्यांचं या जीआरवर समाधान झालेलं नाही.

या जीआरने संपूर्ण मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही, असं त्यांचं म्हणणं आहे. याच विचरांच्या मराठा समाजाच्या शिष्टमंडळाने आज मराठा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. या भेटीनंतर वकील योगेश केदार यांनी भूमिका मांडली. आपण राधाकृष्ण विखे पाटील यांना काही प्रश्न विचारले. या प्रश्नांवर त्यांना समाधानकारक उत्तर देता आले नाहीत, अशी प्रतिक्रिया योगशे केदार यांनी बैठकीनंतर दिली.

आमची मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत बैठक झाली. आमच्यासोबत काही मराठा समाजातील तज्ज्ञ मंडळी होती. सरकारने जो जीआर काढला, ज्या जीआरच्या आधारावर आम्ही माघारी परतलो आणि गुलाल उधळला, पण त्या गुलाला रंग आता फिका पडायला लागला आहे. आझाद मैदानावर ज्यावेळेस राधाकृष्ण विखे पाटील आले होते त्या क्षणालाच आम्ही काही प्रश्न उपस्थित केले होते. ते खरे ठरले आहेत. मी विखे पाटील यांना विचारलं की, मराठवाड्यात साडेआठ हजार गावं आहेत, त्यापैकी ७ हजार गावांमध्ये नोंदीच नाहीत. अशा गावांसाठी तुम्ही काय करणार आहात? त्यावर राधाकृष्ण विखे पाटील यांनी समाधानकारक उत्तर दिलं नाही. त्यांच्याकडे याबाबत उत्तर नाही, असा दावा योगेश केदार यांनी केला.

तुम्ही आज जो गाव पातळीवर अभ्यास तुम्ही सुरु केला आहे, पण त्यामध्ये काही नोंदीच नाहीत तर त्या गावात गाव पातळीवरची समिती स्थापन करुन उपयोग काय? असा प्रश्न विचारला. त्यावरही विखे पाटील यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळालं नाही, असंही योगेश केदार म्हणाले.

एखादा माणूस गावात असेल, त्याच्याकडे कुणबी नोंद असेल तोच माणूस इतरांना त्याच्या कुळातील माणूस प्रतिज्ञापत्रक लिहून देणार आहे की, संबंधित व्यक्ती आपली नातलग आहे. पण तो माणूस गावात राहत नसून तर आम्हाला कोण लिहून देणार? अशा अनेक प्रश्नांचे उत्तरे राधाकृष्ण विखे पाटील देऊ शकले नाहीत. मी त्यांच्या स्पष्टीकरणावर समाधानी नाही. सरकारकडे उत्तरे नाहीत, असं ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्पष्ट केलं आहे की, ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत अशाच लोकांना आम्ही आरक्षण देऊ शकतो. याचा अर्थ आमची आझाद मैदानावर फसवणूक झाली आहे. ती आता सगळ्या मराठ्यांच्या लक्षात आलं आहेत, अशी भूमिका वकील योगेश केदार यांनी मांडली.

## दुकानातून गांजा हस्तगत ; २ जण अटकेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत खेरणे गाव कमानीजवळील एका दुकानातून हजारो रुपये किंमतीचा बेकायदेशीररित्या विक्रीसाठी ठेवलेला गांजा हस्तगत केला असून या प्रकरणी दोघा जणांना अटक करण्यात आली आहे.

तालुक्यातील खेरणे गाव येथील एका दुकानात बेकायदेशीररित्या गांजा ठेवून त्याची विक्री होत असल्याची माहिती वपोनि गजानन घाडगे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आनंद कांबळे, सपोनि अनिरुद्ध गिजे, पोउपनि हर्षल राजपूत, सुभाष डिघे, पो.हवा. धुमाळ, तांडेल, कुदळे, बाबर, देवरे, म्हारसे, पो. शि. भगत, खताळ आदींच्या पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून छापा टाकला असता तेथील दुकानात जवळपास २१ हजार रुपये किंमतीचा ११७० ग्रॅम वजनाचा उग्र वासाचा कोरडा गांजा तसेच इतर वस्तू असा मिळून २२ हजार ६३० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून याप्रकरणी अभिषेक शर्मा (२४ रा.वावंजे) व राहूल सावळे (२२ रा.वावंजे) या दोघांना ताब्यात घेतले असता त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे या गुन्ह्यात सहभागी असलेल्या एका आरोपीचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

### मुंबई उच्च न्यायालयात शेवा कोळीवाडा, उरण पुनर्वसन प्रकरण....

## पुनर्वसन डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करणार ; केंद्र शासनाचे आश्वासन

**दै.रायगड नगरी । उरण**

शेवा कोळीवाडा, उरण येथील सुमारे २५६ विस्थापित मच्छीमार कुटुंबांच्या पुनर्वसनाचा मुद्दा ऐरणीवर आला. शेवा कोळीवाडा पुनर्वसन संदर्भात याचिका माननीय मुंबई उच्च न्यायालयात महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रेडिशनल फिश वर्कर्स युनियन तर्फे दाखल करण्यात आली असून दिनांक ४/९/२०२५ रोजी मा. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे व मा. न्यायमूर्ती संदेश डी. पाटील यांच्यासमोर रिट याचिका ८६५५/२०२५ ची सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व अनुभवी प्रख्यात ॲड.रशीद खान व मानवाधिकार वकील व कार्यकर्ते ॲड.सिद्धार्थ सो.इंगळे यांनी केले.

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की १९८६ सालीच विस्थापितांनी शासकीय मापदंडानुसार १७ हेक्टर क्षेत्रावर पुनर्वसन होईल या आश्वासनावर



आपली जमीन जेएनपीए (जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी ) प्रशासनाला दिली होती.मात्र ४० वर्षे उलटून देखील आजतागायत त्यांचे पुनर्वसन झालेले नाही आणि ते अजूनही जे संक्रमण शिबिर सध्या राहण्यायोग्य नाही अश्या ठिकाणी दाटीवटीने राहत आहेत.

सुनावणीदरम्यान जेएनपीए प्रशासनाच्या वकिलांनी केंद्रीय मंत्रालयीन पातळीवर झालेल्या पत्रव्यवहार व प्रस्तावांची माहिती दिली. केंद्रीय शिपिंग व पोर्ट मंत्रालयाच्या वकिलांनी सांगितले की, प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून डिसेंबर २०२५ पर्यंत कॅबिनेटकडून अंतिम निर्णय घेतला जाईल. न्यायालयाने हे आश्वासन नोंदवून घेतले व पुढील सुनावणीसाठी २२ डिसेंबर २०२५ रोजी प्रकरण ठेवले आहे.

याचिकाकर्त्यांचे वकील व मानवाधिकार कार्यकर्ते ॲड.सिद्धार्थ सो.इंगळे यांनी सांगितले की आम्ही न्यायालयात आज एक ॲडिशनल ॲफिडेव्हिट सादर केले आहे ज्यामध्ये जेएनपीटी प्रशासन व केंद्रीय शिपिंग व पोर्ट मंत्रालयाचा खोटेपणा उघड होईल. सदरील ॲफिडेव्हिट मा.न्यायालयाने रेकॉर्ड वर घेतले असून जेएनपीटी प्रशासन व केंद्र सरकार हे न्यायालयाच्या आदेशाला बांधील आहेत.

दरम्यान याचिकाकर्ते नंदकुमार वामन पवार यांनी काही प्रसारमाध्यमांकडून स्थानिक राजकीय दबावाखाली शेवा कोळीवाडा पुनर्वसन संदर्भात खोट्या बातम्या पसरवून प्रकल्पग्रस्त विस्थापितांची दिशाभूल केली जात असल्याबाबत खेद व्यक्त केला आहे. तसेच अशा माध्यमांना अब्रूनुकसानीची कायदेशीर नोटीस देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आम्ही विनंती करीत आहोत की कृपया विस्थापित प्रस्थापितांमध्ये फूट पाडण्याचे प्रयत्न करू नका, आम्हाला न्याय मिळवून देण्यामध्ये सहकार्य करा.असे आवाहन याचिकाकर्ते नंदकुमार पवार यांनी केले आहे.

# कवितेने केसीआर व्यथित!

राजकारणातील नातेसंबंध किती कुचकामी असतात आणि सत्तेपुढे रक्ताची नाती कशी पातळ निघतात हे तेलंगण या राज्यात दिसते आहे. मुलीच्या विद्रोहाने खचलेले वडील आणि सत्तेच्या असोशीने लढणारे वकील हे तेथील राजकीय चित्र आहे. के. चंद्रशेखर राव यांचा कौटुंबिक कलह चरमसीमेवर पोहचला आहे. त्यासाठी कारणीभूत ठरला आहे, एक पाणीप्रकल्प. तेलंगण आणि गडचिरोलीतील मेडीगड्डा-कालेश्वरम प्रकल्पाने भारत राष्ट्र समिती पक्षात दुही माजवली. तेलंगण आणि महाराष्ट्राची सीमा गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ आणि नांदेड या महाराष्ट्रातील जिल्ह्यांना लागून आहे. गडचिरोलीलगतच्या मेडीगड्डा-कालेश्वरम्चे पाणी पेटले आहे. महाराष्ट्रातील राजकीय डाव केसीआर यांना साधला नव्हता.

धरणाच्या निकृष्ट बांधकामाने त्यांची राजकीय वीण उसवली आहे. तेलंगणचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव आणि त्यांच्या बीआरएस पक्षाचा ताप या धरणाने वाढविला. पक्षाच्या विरोधात वक्तव्य केल्यामुळे चंद्रशेखर राव यांनी त्यांची कन्या के. कविता यांनाच बाहेरचा रस्ता दाखविला. मुलीच्या निलंबनामुळे या प्रकल्पाचे भूत के. चंद्रशेखर राव यांच्या मानगुटीवर बसले. सिरोंचा तालुक्याच्या सीमेवरून गोदावरी नदी वाहते. नाशिकमध्ये उगम पावणाऱ्या गोदावरी नदीचा महाराष्ट्रातला प्रवास सिरोंचा तालुक्यातून संपतो. तेलंगणच्या सिंचनासाठी गोदावरी नदीवर ८० हजार कोटींचा प्रकल्प उभारण्यात आला. प्रकल्पाचा खर्च पुढे दीड लाख कोटींवर पोहचला. जगातील सर्वांत मोठ्या उपसा सिंचन प्रकल्पांपैकी मेडीगड्डा एक आहे. सिरोंचा तालुक्यातील लोकांचा या प्रकल्पाला विरोध होता. के. चंद्रशेखर राव यांनी अवघ्या तीन वर्षांत प्रकल्प साकारला. दोन वर्षांतच सिरोंचा तालुक्याला पुराचा तडाखा बसला. काही पिलर्सना तडे गेले.

उभारलेला पूलही खचला. ऐन विधानसभा निवडणुकीत के. चंद्रशेखर राव सरकारवर भ्रष्टाचाराचा आरोप झाला. निवडणुकीनंतर काँग्रेसचे रेवंत रेड्डी यांचे सरकार आले. नव्या सरकारने सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती पिनाकी चंद्र घोष यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली. त्यांनी केसीआर यांना घेरले. केसीआर यांचे सख्खे भाचे आणि तेलंगणचे तत्कालीन जलसंपदा मंत्री हरीश राव यांना घोष आयोगासमोर बोलावण्यात आले.

रेवंत रेड्डी सरकारने सीबीआय चौकशीची शिफारस केली. दरम्यान, केसीआर कन्या के. कविता यांना दिल्लीच्या मद्य घोटाळ्यात अटक झाली. कविता यांनी अचानक आत्येभाऊ हरीश राव आणि मावसभाऊ संतोष राव यांच्यावर मेडीगड्डा प्रकल्पातील भ्रष्टाचाराबद्दल कोरडे ओढले. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी सरकारच्या निर्णयाला के. चंद्रशेखर राव आणि हरीश राव यांनी आव्हान दिले, मात्र न्यायालयानेच याचिका फेटाळली. अखेर के. चंद्रशेखर राव यांनी कन्या के. कविता यांना पक्षातून निलंबित केले. मेडीगड्डा प्रकल्पामुळे केसीआर यांच्या कुटुंबाचीच मोडतोड झाली. केसीआर यांचे पुत्र तारक रामाराव हे पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष आहेत. हरीश राव यांचा लोकसंपर्क दांडगा आहे. काँग्रेसमध्ये जाऊन के. कविता या वादाला नवी फोडणी देऊ शकतात. प्रकल्पाबाबतचा प्रत्येक निर्णय चंद्रशेखर राव यांचाच होता, या माजी मुख्य अभियंता एन. वेंकटेश्वरलू यांच्या वक्तव्याने केसीआर अडचणीत आले आहेत. के. कविता चाणाक्ष आहेत. बीटेकची पदवी घेतल्यानंतर त्यानी मिसिसिपी विद्यापीठातून मास्टर ऑफ सायन्स केले. त्या अमेरिकेत सॉफ्टवेअर इंजिनीअर होत्या. उद्योगपती देवनपल्ली अनिल कुमार यांच्याशी त्यांनी विवाह केला. २००६नंतर वडिलांसोबत त्या राजकारणात आल्या. केसीआर यांनी त्यांना २०१४मध्ये निजामाबादेतून खासदार केले. २०१९मध्ये लोकसभेत पराभूत होताच निजामाबादेतूनच त्यांना विधान परिषदेवर घेतले. कवितेचे वडिलांशी यमक काही जुळले नाही. धरणातील पाण्याचा ताळेबंद उद्या निघेलही; नात्यांच्या राजकीय विसर्गात मुरलेले पाणी कसे तपासणार, हा प्रश्न आहे.

# पावसाळ्यातील साथरोग- किटकजन्य आजार टाळण्याकरिता काळजी घेण्याचे महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**




सध्या परतीच्या पावसाने महापालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी पाणी साठले असून या कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्धवण्याची शक्यता असते. या कालावधीत नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन आयुक्त श्री.मंगेश चितळे यांनी सांगितले आहे. तसेच महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करुन नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास या आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे.

याच पाश्वर्भूमीवरती उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर यांच्या सूचनेनूसार वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने, आज पनवेल महानगरपालिका अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्यवर्धिनी केंद्र, आपला दवाखाना (सर्व) व स्वच्छता निरीक्षक यांची किटकजन्य व जलजन्य या साथीच्या आजाराविषयी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणी संदर्भात आढावा बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकिस घनकचना व आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, साथरोगअधिकारी डॉ. आकाश ठसाळे, स्वच्छता निरीक्षक संजयजाधव, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील एचए, एमपीडब्लू व स्वच्छता निरीक्षक यांनी बैठकीस उपस्थित होते.

पावसाळ्यातील किटकजन्य रोग टाळण्याकरिता पालिका क्षेत्रातील सर्व सोसायट्यां कंस्ट्रशन साईटस्, भंगार दुकाने, टायर दुकान, नारळ विक्री दुकाने यांची महापालिके आरोग्य विभागाच्यावतीने तपासणी केली जात आहे. याचबरोबर जनजागृतीपर हॅण्डबिले, पत्रके यांचे वाटप करण्यात येत आहेत. ज्या सोसायट्यांमध्ये किटकजन्य रोगाचे रूग्ण आढळत आहे त्या सोसायट्याच्या अध्यक्षांनी , सचिवांनी किटकजन्य रोग टाळण्याबाबतच्या महापालिकेने दिलेल्या सूचना सोसायटीमधील रहिवाश्यांना द्याव्यात.

तसेच महापालिकेसही idsppanvelcorporationgmail.com या इमेल आयडीवरती माहिती कळवावी. तसेच पालिका क्षेत्रातील खाजगी लॅबधारकांनी किटकजन्य आजाराच्या रूग्णांची माहिती संबधित इमेलआयडीवरती द्यावी , जे खाजगी लॅबधारक ही माहिती कळविणार नाही त अशा लॅबवरती महापालिकेच्यावतीने कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती व मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.

# शेकडो विद्यार्थ्यांनी केली जोहेचा राजाची पहिली महाआरती

**दै.रायगड नगरी । पेण**

गणपती बाप्पाच्या मूर्तीचे माहेरघर म्हणून संपूर्ण देशात ओळख असलेल्या पेण तालुक्यातील गणेश मूर्तीचे हब जोहे गावात साखरचौथ निमित्त जोहेचा राजाची पाच दिवसांसाठी स्थापना करण्यात आली आहे. यावेळी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरच्या न्यू इंग्लिश जोहेच्या शेकडो विद्यार्थी विद्यार्थिनी, शिक्षकवर्ग यांच्या हस्ते जोहेच्या राजाची पहिली महाआरती संपन्न झाली.

वर्षभर गणेश मूर्ती बनविण्यात पेण तालुक्यासह जोहे गावातील जेष्ठ, महिला व युवा वर्ग व्यस्त असतो. मात्र श्रीगणेश चतुर्थी गणेशोत्सव झाल्यानंतर पहिल्या संकष्टी चतुर्थीला विशेषतः पेण, पनवेल, उरण आदी तालुक्यात घरगुती व सार्वजनिक स्वरूपात मोठ्या प्रमाणात साखरचौथ गणपती सण साजरा केला जातो. त्याचप्रमाणे २०१३ साली स्थापन झालेल्या व शाळेय विद्यार्थी दत्तक घेणे, महिलांसाठी वेगवेगळे शिबीर, रक्तदान शिबिर आयोजित करणे आदी सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या जोहेचा राजा प्रतिष्ठान तर्फे गणेश मूर्तीचे हब म्हणून ओळख असलेल्या जोहे गावात दरवर्षी प्रमाणे पाच दिवसांसाठी साखरचौथ गणपती बाप्पा विराजमान झाले आहेत.

यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रात असंख्य विद्यार्थी घडविणाऱ्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश जोहेच्या शेकडो विद्यार्थ्यांना जोहेचा राजाच्या पहिल्या महाआरतीचा मान देण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य उत्तम गलांडे व विद्यार्थी यांच्या हस्ते राजाची महाआरती संपन्न झाली. याप्रसंगी गायक लावण्या महेश पाटील हिच्या सुमधुर आवाजाने व पार्थ सागर पाटील याच्या टबलाच्या साथीने राजाची महाआरती घेण्यात आली. उपस्थित शेकडो विद्यार्थ्यांना प्रतिष्ठान तर्फे वही, पेन, आरती संग्रह व खाऊ वाटप करण्यात आला. या महाआरतीस प्राचार्य उत्तम गलांडे, विनोद पन्हाळकर, अभिजित पाटील, संतोष घरत, गवळी, जोहेचा राजा प्रतिष्ठानचे संस्थापक देवा पेरवी, अध्यक्ष नारायण म्हात्रे, कार्याध्यक्ष विनोद म्हात्रे, वैभव धुमाळ, कमलाकर बोरकर, रवींद्र रसाळ, धनंजय पाटील, दीपक पाटील, निनाद धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.



# वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र संस्थेचा 'हितचिंतक मेळावा'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरीक संघाचे सभागृह, ठाणा नाका मार्ग पनवेल येथे रविवार दिनांक १४ सप्टेंबर रोजी दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत पनवेल परिसरातील वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र या संस्थेचा 'हितचिंतक मेळावा' आयोजित करण्यात आला आहे .

जनजाती समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी रायगड जिल्हयामध्ये वनवासी कल्याण आश्रम या संस्थेचे कार्य १९७९ पासून सुरू आहे. शिक्षण, खेलकुद, आरोग्य, उद्योग तसेच महिला सबलिकरण व सक्षमिकरण या आयामाच्याव्दारे संस्था जिल्हातील जवळपास ५०० पाडयांमध्ये काम करीत आहे. या कार्यासाठी आर्थिक, वस्तुस्वरूपात तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वेळ देऊन अनेक समाज बांधव, संस्था सढळ हस्ते मदत करीत असता त्यांचा हितचिंतक मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख वक्ता सुशील कुळकर्णी विषय : मतांतरण आणी वनवासी कल्याण आश्रमाचे कार्य हा असणार आहे . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहर समिती - पनवेल सौ. अश्विनी मुळे अध्यक्ष, सौ. सुवर्णा वत्सराज सचिव, सुरेंद्र गाडगीळ सहसचिव, जिल्ह्या समिती - कुलाबा, अविनाश म्हात्रे अध्यक्ष, उदय टिळक उपाध्यक्ष,रविंद्र पाटील सचिव तसेच माजी विद्यार्थी, चिंचवली विद्यार्थी वसतीगृह, पनवेल हे अथक मेहनत घेत आहेत .

# पोस्को महाराष्ट्र स्टील तर्फे शेतकऱ्यांचा अभिनव फार्मर्स क्लब पुणे येथे अभ्यास दौरा




**दै.रायगड नगरी । माणगाव**

दि. १२ ऑगस्ट व दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या सीएसआर उपक्रमांतर्गत, गोरेगांव आणि इंदापूर विभागातील प्रगतशील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा पुणे येथील अभिनव फार्मर्स क्लब येथे आयोजित करण्यात आला.

या अभ्यास दौर्याचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना नव्या शेती तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणे, शेतकऱ्यांना रासायनिक खत वापराकडून सेंद्रिय शेतीकडे वळवणे तसेच त्यांच्या उत्पन्नात आणि उत्पादनात वाढ कशी करावी याची माहिती देणे हा होता. पहिल्या टप्प्यात कृषी विस्तार अधिकारी पंचायत समिती माणगांव यांनी निवडलेले १६ प्रगतिशील शेतकरी सहभागी झाले, तर दुसऱ्या टप्प्यात माणगांव मधील रायगडचा शेतकरी राजा एफपीओ मधील १४ शेतकरी सहभागी झाले. यात ८ महिला शेतकऱ्यांचाही समावेश होता.

अभिनव फार्मर्स क्लब हा सेंद्रिय शेतीचा अग्रणी असून, रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर टाळून नैसर्गिक व पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा प्रसार करण्याचे मार्गदर्शन येथे केले जाते. या दौर्यात शेतकऱ्यांना पॉलीहाऊस तंत्रज्ञान, सेंद्रिय खतांचा वापर, रासायनिक खतांचा वापर कमी करून उत्पादनात वाढ कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. एक एकर शेतीत विविध प्रकारची पिके घेऊन उत्पादन वाढविण्याचे मॉडेलही शेतकऱ्यांना दाखवण्यात आले.

अभिनव फार्मर्स क्लबचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर बोडके यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत सेंद्रिय शेती व बाजारपेठेत उत्पादनाला चांगला भाव मिळविण्याच्या पद्धती समजावून सांगितल्या. त्यांनी शेतकऱ्यांना आवश्यक त्या सर्व मदतीचे आश्वासन दिले. फक्त पिकवून चालत नाही, तर ते कुठे आणि कसे विकायचे हे समजणे देखील महत्त्वाचे आहे, असे मार्गदर्शन करताना श्री. बोडके म्हणाले. या दौऱ्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पारंपरिक शेतीत सुधारणा करून नवीन तंत्रज्ञान अवलंबण्याची नवी दिशा मिळाली. त्यांनी जमिनीच्या गुणवत्तेत सुधारणा कशी करावी, सेंद्रिय शेतीला चांगला प्रतिसाद कसा मिळवावा व उत्पादनाला बाजारपेठेत चांगला भाव कसा मिळेल याबाबत सखोल मार्गदर्शन मिळाले. शेतकऱ्यांनीही हा दौरा प्रेरणादायी व उपयुक्त असल्याचे सांगितले. पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल व आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल.

## रायगड जिल्ह्यातील पहिला अमृत मेळावा पेण येथे आयोजन

**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड जिल्ह्यातील पेण येथे पहिला अमृत मेळावा चे आयोजन भाऊसाहेब नेने महाविद्यालय सभागृह पेन एज्युकेशन सोसायटी पेन जिल्हा रायगड येथे आयोजित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, अमृत महाराष्ट्र शासनाची स्वायत्तता संस्था आयोजित खुल्या प्रवर्गातील ब्राह्मण, गुजराती, मारवाडी, सिंधी, कच्ची, पाटीदार, राजपूत आधी प्रवर्गासाठी अमृत मेळाव्याचे आयोजन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ सकाळी १० दहा ते दुपारी०२ दोन वाजेपर्यंत भाऊसाहेब नेने महाविद्यालय सभागृह पेन एज्युकेशन सोसायटी पेन जिल्हा रायगड येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर सदर मेळाव्याचे प्रमुख पाहुणे व वक्ते एडवोकेट श्री बापूसाहेब नेने, बँक ऑफ इंडिया पेन ब्रांच मॅनेजर श्री सौरभ पंनशीकर हे प्रमुख पाहुणे व वक्ते उपस्थित राहणार असून निमंत्रक अॅड.मंगेश नेने ९९७५००७६००, असून संपर्क शैलेश विनायक मराठी अमृत रायगड जिल्हा व्यवस्थापक ९११२२२७८५९, अमित सामंत कोकण विभाग व्यवस्थापक ८२७५४५५४६५, महेश हेलवाडे पेन ब्राह्मण सभा ९७६४९०३५९८ त्यांच्याशी संपर्क साधून आपली उपस्थिती अमृत मेळावा साठी करावी.


# पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१०२०६**

दुरध्वनी कार्यालय ०२२- २७४५८०४०/४१/४२ | फॅक्स नं. ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय ०२२-२७४५५७५१ | आयुक्त कार्यालय ०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com | वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र.पमपा/आस्था/से.नि.अ/५१२५/प्र.क्र.२४/१६१८/२०२५ दि.११/०९/२०२५

## थेट मुलाखत (Walk in Interview)

पनवेल महानगरपालिकेमध्ये विवक्षित कामकाजाकरीता खालील नमुद केल्याप्रमाणे शासकीय/निमशासकीय कार्यालय / सिडकोकडील, तसेच नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिकेच्या सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात प्रथम सहा महिन्यांकरीता करार पद्धतीने खालील अटी व शर्ती नुसार सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी दि. १८/०९/२०२५ रोजी थेट मुलाखत (Walk in Interview) आयोजित केली आहे. इच्छुक उमेदवारांनी दि. १८/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृह, पनवेल येथे आपली मूळ कागदपत्रे, सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र, अंतिम वेतन प्रमाणपत्र, ना विभागीय चौकशी, प्रमाणपत्र व अनुषंगिक कागदपत्रे घेऊन स्वतः हजर राहावे. सविस्तर जाहिरात महापालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| पदाचा संवर्ग | अनुभव | मानधन |
|---|---|---|
| सेवानिवृत्त कामगार अधिकारी (पद संख्या ०१) | शासकीय / निमशासकीय / सिडको / नगरपरिषद / न.पा./ म.न.पा. मध्ये सेवेत असताना किमान १० वर्षे | म. शा. सा. प्र. वि. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३ दि.१७/१२/१६ आणि दि.८/९/२०२३ नुसार निश्चित केलेले मानधन. |
| सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता (पाणी पुरवठा विभाग) (पद संख्या ०१) | शासकीय / निमशासकीय / सिडको / नगरपरिषद / न.पा./ म.न.पा. मध्ये सेवेत असताना पाणी पुरवठा विभागामध्ये किमान ०५ वर्षे | |

अटी व शर्ती :-

१) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम असलेल्या प्राधिकरणाने विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींस प्राप्त होणाऱ्या अधिकारांतर्गत येणारे आवश्यक दस्तऐवज / कागदपत्रे माहिती व आधार सामुग्री याबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील,

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज, निश्चित केलेल्या विहित कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

७) सदरची सेवा ही फक्त ३ वर्षाच्या मर्यादेकरिताच राहणार आहे. तथापी १ वर्षाच्या कालावधीत त्यांचे कामाचे मूल्यमापन करुन पुढे सदरची सेवा सुरु ठेवणे किंवा नाही, याबाबत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

८) यापूर्वी करण्यात आलेल्या सेवा कालावधीचा तपशील तसेच विभागीय चौकशी, फौजदारी गुन्हा याबाबतची माहिती सदरच्या मुलाखती वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

९) सदरच्या मुलाखती वेळी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांसोबत स्व-घोषणापत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

१०) पनवेल महानगरपालिकेस आवश्यक तितकेच अधिकारी/कर्मचारी घेण्यात येतील.

**सही/-**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

### अतिरीक्त आयुक्तांनी केली रस्ते दुरुस्तीच्या कामांची पाहणी

# रस्ते दुरूस्तीची कामे तातडीने करण्याबाबत संबधितांना दिल्या सूचना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खारघर प्रभागातील सेक्टर ३५, तळोजा गाव ,कोयनावळे येथील रस्ते दुरूस्तीची आज दिनांक ११ सप्टेंबर रोजी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी प्रत्यक्ष पहाणी केली. रस्ते दुरूस्तीची कामे तातडीने करण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

आयुक्त तथा प्रशासक श्री.मंगेश चितळे यांनी खराब झालेल्या रस्त्यांची दुरूस्ती लवकरात लवकर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.त्यानूसार अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी आज खारघर प्रभागातील तळोजा गाव ,कोयनावळे येथील रस्त्यांची प्रत्यक्ष पहाणी केली. व तात्काळ रस्ते दुरूस्ती करण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

यावेळी प्रभाग अधिक्षक जितेंद्र मढवी, अभियंता प्रकाश दोडे, महापालिका अधिकारी व संबधित ठेकेदार, कर्मचारी उपस्थित होते. सध्या पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे युध्द पातळीवर सुरू आहेत. यामध्ये ,खारघर प्रभागात खारघर रेल्वे स्टेशन रोड, सेक्टर ६, उत्सव चौक ते गुरूद्वारा , शिल्प चौक, तळोजा गाव, कोयनावळे, पालेखुर्द, अशा विविध भागात रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने केली जात आहे.नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंताशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**रस्त्याबाबत तक्रारी असल्यास संबधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा**

१. राहूल जाधव, कळंबोली, मोनं ८२३७२०८४२५ २.मयूर गडकरी, खारघर, मोनं ९१३७२११४९९ ३. प्रतिक आंग्रे, नवीन पनवेल, मोनं ९३२११४१०७२ ४. किरण पाटील, मोनं ९६६४५३८२०९



# माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीचे कर्जत आगार प्रमुखांना निवेदन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सर्वसामान्य लोकांना वाहतुकीसाठी शासनाची मिनीबस सेवा हा एक उत्तम स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाची हमी देणारा पर्याय उपलब्ध असून या बस सेवेच्या मार्गात अनेक विघ्न निर्माण होत असल्याने नेरळ (खांडा) येथील अरुंद मार्गावर चालक/वाहक यांनाही वाहन चालविताना अनेकदा नेरळ येथील वाहन चालकांच्या रोषाला सामोरे जावे लागते.त्यामुळे चालकांनी सदर बस नेरळ खांडा या ठिकाणी शनिवार/रविवार या दोन दिवशी नेण्यास नकार दिल्याचे पर्यटन बचाव संघर्ष समितीला समजले होते.त्यामुळे सर्वसामान्य लोकांची गैरसोय होऊ नये यासाठी समितीच्या शिष्टमंडळाने दि.१० रोजी व्यवस्थापक आगारप्रमुख कर्जत यांची भेट घेऊन नेरळ खांडा येथील बस थांबा हलविण्यास आमचा विरोध राहील.तसेच बस चालक व कंडक्टर यांच्या सोबत वाद निर्माण होत असल्यास तेथील पोलीस प्रशासनाची मदत घेऊन मिनीबस व प्रवाशांच्या सुरक्षितेचा उपाय म्हणून पोलीस कोस्टेबलची मागणी करण्यात यावी आणि प्रवाशांना योग्य सुविधा देणे ही आपली जबाबदारी आहे असे लेखी निवेदन दिल्यानंतर आगार प्रमुख देवानंद मोरे यांनी सदरचा निर्णय आम्ही मागे घेत आहोत व लवकरच मी स्वतः नेरळ पोलीस प्रशासनाला देखील होणाऱ्या प्रकाराबाबत कल्पना देतो असे आश्वासित केले.यावेळी समितीचे कुलदीप जाधव, प्रदीप घावरे,चंद्रकांत जाधव, गिरीश पवार, राजेश चौधरी, दिनेश सुतार, मुकुंद रांजाणे हे सदस्य उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

आमचे अशिल, श्री. मंदार विनायक दामोदरे रा. प्लॉट नं. ०५, रोड नं. ५, सेक्टर नं.१, न्यु पनवेल (ईस्ट) ता. पनवेल, जि. रायगड, पिन: ४१०२०६ यांचे व्दारे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येत आहे की खालील वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक श्रीमती वैशाली विनायक दामोदरे रा. प्लॉट नं. ०५, रोड नं. ५, सेक्टर नं.१, न्यु पनवेल (ईस्ट) ता. पनवेल, जि. रायगड , पिन: ४१०२०६, यांनी त्यांचा मुलगा श्री. मंदार विनायक दामोदरे पत्ता वरीलप्रमाणे यांना नोंदणीकृत बक्षीसपत्र (दस्त क्रं. पवल १७२००/२०२५) या दस्ताने हस्तांतरीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे नवीन पनवेल (पूर्व), ता. पनवेल जि. रायगड.**
**रेसिडेनसीयल बंगलो प्लॉट नं. ०५**
**रोड नं. ५ सेक्टर नं.: १,**
**क्षेत्रफळ : १५० चौ. मीटर पैकी ११७.४७ ची मीटर बील्ट अप**

वरील वर्णनाच्या मिळकतीबाबत इतर कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विकी, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क हीतसंबंध असल्यास कींवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहरास हरकत असल्यास संबधची व्यती किंवा संस्थानी आपली हरकत पूराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वताःहून हजर होउन आमचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हीतसंबध नाही. किंवा असल्यास तो हक्क हीतसंबध त्यांनी आमचा अशीलांच्या लाभात सोडून दिला असून त्याची आमच्या आशिलांच्या लाभात होणाऱ्या बक्षीसपत्रास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

दि.१२/०९/२०२५
ठिकाण : पनवेल

सही/-
**ॲड. उदय प्रकाश मोकल**
**मु. पो. चिरनेर, ता. उरण, जि. रायगड**
**पीन कोड: ४१०२०६**
**मो.नं. ९०८२९११९१३**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल श्री. संजय शांताराम कुंरगळे व श्री. अमित शांतीलाल जैन यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली बिन शेती जमिन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक श्रीमती. वैशाली विनायक बागडे, सौ. अंजली जगदिश कापडणे, गौरी योगेश मुद्राळे यांच्या कडून कायम स्वरुपी खरेदी खताने घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : रिस, ता. खालापूर, जि. रायगड**

| गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | मालकाचे नाव | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १७२ | १/अ/१८ (प्लॉट नं.१८) | २.९३.०० चौ.मीटर | श्रीमती.वैशाली विनायक बागडे<br>सौ.अंजली जगदीश कापडणे<br>सौ.गौरी योगेश मुद्राळे | २९.३० |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर या पुर्वी ब्रिदि, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाणं, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, बमर, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हित संबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीकरार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तुम्ररी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

खालापूर
दि.११/०९/२०२५

सही/-
**ॲड.विकास अशोक बडे**
**बी.ए. एल.एल.बी.**
**वकील उच्च न्यायालय**

**ऑफिस : गाळा नं. १, समर्थ शिवराम मार्केट, मेन बाजार पेठ, मोहोपाडा, ता. खालापुर, जि. रायगड ४१०२२२.**
**मो.नं. ९६६५१९७२३१/ ८८८८१३३४०२**

## जाहीर नोटीस

खालापूर येथील मे दिवाणी न्यायाधीश क स्तर सो यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.९५/२०२४
नि.नं.१३/ड
ने.ता.१०/१०/२०२५

1) Smt Anjali Ashok Mokashi
Age-76 year, Occu-House Wife
R/O- Room No 6 Shruti CO-OP HSG
Society, Khopoli Tal-Khalapur,
Dist- Raigad
2) Shree Amey Ashok Mokashi
Age 41 year, Occu-Service
R/O At-Room No 6 Shruti CO-OP HSG
Society, Khopoli Tal-Khalapur,
Dist- Raigad Applicants
v/s
None

तमाम जनतेस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की अर्जदार यांचे वडील व पती कै Ashok Dinkar Mokashi (herein referred to as the said deceased) ह्यांचा मृत्यू १/५/२०२४. रोजी R/O- Room No 6 Shruti CO-OP HSG Society, Khopoli Tal- Khalapur, Dist-Raigad येथे यांच्या राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या वडिलांचा व पतीचा वारस दाखला मिळविण्यासाठी खालापूर येथील मे दिवाणी सो यांचे कोर्टात अर्ज केलेला आहे. अर्जदार न्यायधीश क स्तर यांच्या पतीचा व वडिलांचा मृत्यू वरील नमूद केलेल्या ठिकाणी झालेला आहे त्या बद्दल कोणास काही कळविण्याचे असेल तसेच सदरहू अर्जास कोणाची हरकत असेल तर ही जाहीर नोटिस प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन कायदेशीर हरकती नोंदवण्याच्या आहेत या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास सदरहू व्यक्तीच्या वारसाची नोंदणी करण्याचे आदेश संबधितांना देण्यात येतील यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे ही जाहीर नोटिस आमच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्यांनीशी आज रोजी दि.११/०९/२०२५ रोजी दिली.

| सही/- लिपीक दि.न्या.क.स्तर, खालापूर | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, खालापूर |
|---|---|---|

## जाहीर नोटीस

सदर जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते आहे की, आदिवासी विकास परिषद हि संस्था रजिस्टर नंबर ४९६/रायगड/अलिबाग/२००९ असा आहे. या संस्थेचे कार्यालय ६-७, तेजल अपार्टमेंट, परदेशी आळी, नित्यानंद मार्ग, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे आहे.

आदिवासी विकास परिषद यांची विदयमान कार्यकारणी यांचा कार्यकाल संपुष्टात आला आहे. सबब नवीन कार्यकारणीच्या निवडीबाबत सदर नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आपली हरकत खालील सही करणार यांच्या कार्यालयात लेखी कळवावे. वरिल मुदतीत कोणाकडुनही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास नवीन कार्यकारणी सर्वांना मान्य व कबुल आहे असे समजण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ११/०९/२०२५

सही/-
**ॲड.मदन गणपत गोवारी**
**तेजल अपार्टमेंट, शॉप नं. ६/७,**
**स्वामी नित्यानंद मार्ग, परदेशी आळी,**
**तालुका पोलीस स्टेशन जवळ,**
**ता. पनवेल, जि.रायगड, पनवेल-४१०२०६**

ॲड.तेजल संजय जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.१०४९/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.२८/१०/२०२५

कै. रोहिदास सुदाम पाटील मयतचे वारस
१) श्रीमती. निरा रोहिदास पाटील,
वय- ४६ वर्षे, धंदा- गृहीणी,
२) कु. विघ्नेश रोहिदास पाटील, आ.प. क
श्रीमती. निरा रोहिदास पाटील,
वय- १६ वर्षे, धंदा- शिक्षण,
वरील १ व २रा. लक्ष्मी नारायण मंदिर जवळ
कोळी पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड.
३) सौ. काजल रोहिदास पाटील, लग्नानंतर
सौ. काजल उदय काथारा,
वय- २८ वर्षे, धंदा- गृहीणी,
रा. नेवाळी, पो. आदई, ता. पनवेल, जि. रायगड.
४) सौ. तेजु रोहिदास पाटील, लग्नानंतर
सौ. तेजु सनी भोईर,
वय- २५ वर्षे, धंदा- गृहीणी,
रा. लक्ष्मी नारायण मंदिर जवळ,
कोळी पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड.
५) सौ. स्नेहा रोहिदास पाटील, लग्नानंतर
सौ. स्नेहा कुणाल पाटील,
वय- २४ वर्षे, धंदा- गृहीणी,
रा. माऊली मंदिर जवळ, चिंध्रण, ता. पनवेल, जि. रायगड.
६) सौ. पायल रोहिदास पाटील, लग्नानंतर
सौ. पायल अविष्कार गायकर,
वय- २०वर्षे, धंदा- गृहीणी,
रा. लक्ष्मी नारायण मंदिर जवळ,
कोळी पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड. अर्जदार

जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, कै. रोहिदास सुदाम पाटील हयांचे निधन दि. १७/०२/२०२५ रोजी लक्ष्मी नारायण मंदिर जवळ, कोळी पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड. येथे राहत्या घरी निधन झाल्याने श्रीमती. निरा रोहिदास पाटील, वगैरे हयांनी कै. रोहिदास सुदाम पाटील यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन १**

| गावाचे नांव | अवार्ड नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| पारगाव/डुंगी | १९२ | २० | ३ | ०-०८-७ |
| | | २६ | २/३ | ०-०३-८ |
| | | २७ | १/५ | ०-२२-० |
| | | २९ | १७ | ०-१५-० |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै. रोहिदास सुदाम पाटील यांना सिडकोकडून मौजे-पुष्पकनगर/दापोली, ता. पनवेल, जि. रायगड येथे भुखंड क्रं. ५८, सेक्टर-८, क्षेत्र ७८० चौ. मी. वितरीत करण्यात आलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन २**

| गावाचे नांव | अवार्ड नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| पारगाव | १३६ | २४ | ४ | ०-०५-३ |
| | | ४३ | ३ | ०-०३-५ |
| | | ४३ | ५ | ०-१५-६ |
| | | ६७ | १ | ०-२-० |
| | | ७० | ३ | ०-१५-१ |
| | | ७१ | ५ | ०-०७-१ |
| | | ७१ | ६ | ०-१२-७ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै. रोहिदास सुदाम पाटील यांना सिडकोकडून मौजे-पुष्पकनगर/दापोली, ता. पनवेल, नि. रायगड येथे भुखंड क्रं. २३, सेक्टर-२, क्षेत्र ९७० चौ. मी. वितरीत करण्यात आलेला आहे. श्रीमती. निरा रोहिदास पाटील, वगैरे हे कै. रोहिदास सुदाम पाटील यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती. निरा रोहिदास पाटील, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. रोहिदास सुदाम पाटील यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ११/०९/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, अ. में आर ही विल्वर तर्फे भागीदार १. श्री रामआशिष डी पांडे २. श्री संतोष आर पांडे पत्ता : ऑफिस ५०५/५०७, डीस्मा कॉम्प्लेक्स, प्लॉट नं २४६, के डब्लू सि, कळंबोली नवी मुंबई ४१०२१८ (५० टक्के) ब. १. श्री भिकाजी बामा पाटील कै रमेश बामा पाटील मयत त्यांचे वारस १. श्रीमती शारदा रमेश पाटील २. श्री.विकास रमेश पाटील ३.श्री. प्रशांत रमेश पाटील ४. श्री.आकाश रमेश पाटील (५० टक्के) राहणार : पेंधर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांना सिडको लि, कडून मौजे नोड तळोजा येथील फाईल नं १०५५ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे हस्तांतरण आमच्या नावे झालेले आहे त्याप्रमाणे माझे अशिल मे अथर्व रिअलिटी तर्फे भागीदार १. श्री किरण भिकाजी पाटील २.श्री नितेश बाळकृष्ण पाटील ३. बाळाराम सुधाम पाटील राहणार : ८७२, अरिहंत अंशुलाचे समोर, घोट गाव, पोस्ट घोट कॅम्प, तालुका पनवेल जिल्हा रायग्ड ४१०२०८ यांनी खालील वर्णन केलेला भूखंड क्र १८, सेक्टर २२ सी, क्षेत्र ११४९.६६ चौ.मी पैकी मे आर डी बिल्डर तर्फे भागीदार यांच्या हिश्ययाचे ५० टक्के अविभाज्य भाग त्रिपक्षीय करारनामा, हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशील**

**सिडको फाईल नं.१०५५ तळोजा**

| नोड | सेक्टर | भूखंड क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | १८ | २२ सी | ११४९.६६ चौ.मी पैकी आर डी बिल्डर तर्फे भागीदार यांच्या हिश्श्याचे ५० टक्के अविभाज्य भाग |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दाया, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वयुपीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. मदर मुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दि.११/०९/२०२५

सही/-
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## PUBLIC NOTICE

PUBLIC NOTICE is hereby given that my client intends to purchase Land bearing Survey No.132/21/K, admeasuring area 0-27-00, H.R.A. Potkharaba 0.01.00 H.R.A. total area 0-28-00 Situated in Village Vasheni, Taluka Uran, District Raigad (more particularly described in Schedule mentioned hereunder) from Mohanlal Mahadev Mhatre, Chandrabhaga Sudhakar Mhatre, Harishchandra Sudhakar Mhatre, Shekhar Sudhakar Mhatre, Sanjeevani Sanjay Jambhale, and Ankita Ashok Patil.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

Survey No.132/21/K, admeasuring area 0-27-00, H.R.A. Potkharaba 0.01.00 H.R.A. total area 0-28-00 Situated in Village Vasheni, Taluka Uran, District Raigad.

Any person/s, Legal Heirs, firm, company having any claims in, to or over the said Land or any part thereof, either by way of sale, mortgage, lien, gift or otherwise howsoever, should give Notice of such Claim/Objection in writing stating therein the nature of his/her/their Claim/Objection alongwith other particulars sufficient to identify the same as well as documentary evidence, in support thereof and the same must be lodged with the office of the undersigned within 15 days from date of Publication of this Notice failing which it shall be presumed that the said Land to be purchased is free from all encumbrances and the rights and claims or any holder of the claim, if any has been waived and my client shall proceed with the purchase of the said Land without considering any Claim or Objection received after expiry of Notice period as aforesaid.

SD/-
**ANKIT SHARMA**
**ADVOCATE**
**Office No.81, Gautam Complex,**
**Sector -11, C.B.D. Belapur**
**Navi Mumbai, District Thane,**
**Maharashtra, India - 400614.**
**Con.no.+91-9022307027**

मा.खंदारे साो कोर्ट
वकील : ॲड.सचिन अं. म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.६९६/२०२५
नि.नं.१३/ड
ने.ता.२२/०९/२०२५

१) श्रीमती. रंजना तुळशीराम म्हात्रे,
वय ६६ वर्षे, व्यव काही नाही,
२) श्री. आदेश तुळशीराम म्हात्रे,
वय ४५ वर्षे, व्यव धंदा,
३) श्री. चेतनेश तुळशीराम म्हात्रे,
वय ४२ वर्षे, व्यव धंदा,
४) श्रीमती. जागृती तुळशीराम म्हात्रे,
वय ४६ वर्षे, व्यव- गृहिणी,
सर्व रा- पी एल ६- ११/०:४, सेक्टर नं. १७,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, कै. तुळशीराम मंगळया म्हात्रे यांचा मृत्यू दिनांक १३/१२/२०२१ रोजी पत्ता. पीएल ६ -११/०:४, सेक्टर नं. १७, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. येथे झालेले असून त्यांचे खालील मिळकती बाबत वारस दाखला मिळणे करीता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**३/१) नवीन पनवेल येथील मिळकतीचे वर्णन,**
अ. मौजे. नवीन पनवेल, गट व सर्व्हे क्र. २४१/२, २६६/१,
प्लॉट नं. ०३, सेक्टर नं. १७,
पी एल ६ - ११/०:४, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड,

**३/२) पनवेल येथील मिळकतीचे वर्णन,**
अ. मौजे. पनवेल येथील सी टी एस क्र. १२६२ A,
शॉप नं. १२ A, मनिष मार्केट
शिवाजी रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

**३/३) उलवे येथील मिळकतीचे वर्णन,**
अ. मे. सुखकर्ता अपार्टमेंट् को. ऑप सोसा,
प्लॉट न, ७६, सेक्टर नं.१९, उलवे नोड,
उलवे, ता. पनवेल, जि. रायगड.
या इमारती मधील सदनिका क्र. १०१, १०२, २०४, २०५, ३०२, ४०१ व गाळा क्र. १, २, ३, ४.
ब. प्लॉट नं. ५०, सेक्टर नं. १९, उलवे,
ता. पनवेल, जि. रायगड. क्षेत्र. १०० चौ. मीटर.
क. प्लॉट नं. ऐ २३, सेक्टर नं. १५, उलवे,
ता. पनवेल, जि. रायगड. क्षेत्र. ४५९.८३ चौ. मीटर
ड. संचिका क्र. ७६४/उलवे, नोड उलवे, सेक्टर नं. १९,
भुखंड क्र. ३७५, क्षेत्र. ४० चौ. मीटर.

**३/४) मौजे : न्हावे, ता. पनवेल, येथील मिळकतीचे वर्णन,**

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे- न्हावे, ता. पनवेल, जि. रायगड,**

| अ.क्र. | सर्व्हे नं./हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|
| १ | ६/अ/७५९ | ००-६९-०० |
| २ | ६/अ/४३९ | ००-२७-०० |

वरील वर्णन केलेली मिळकत ही कै. तुळशीराम मंगळया म्हात्रे यांचे नावे आहेत, म्हणुन अर्जदार यांनी वारसदाखला मिळणेकरीता मे. कोर्टात अर्ज करीत आहे.

वरील अर्जदार हे कै. तुळशीराम मंगळ्या म्हात्रे, यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना. कोर्टात दाखल करावी सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरून ना. कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ११/०९/२०२५ रोजी माझ्या सहीनीशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

### काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांचे विनोबा भावे यांना अभिवादन

# गागोदे बुद्रुक येथे विनोबा भावे यांच्या स्मरणार्थ महेंद्रशेठ घरत स्वागत कमान उभारणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भूदान चळवळीचे प्रणेते आणि भूदान चळवळीद्वारे भूमिहीनांना जमिनी देणारे, 'भारतरत्न' विनोबा भावे यांची जयंती गुरुवारी (ता. ११) पेण येथील त्यांच्या जन्मगावी गागोदे बुद्रुक येथे साजरी करण्यात आली. यावेळी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी विनोबा भावे यांना अभिवादन केले.




यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, ''विनोबा भावे महान होते. त्यांनी जगाला आदर्शवत अशी भूदान चळवळ राबवली. ज्यांना जमिनी नाहीत त्यांना विनोबा भावे यांनी सावकारांकडून जमिनी घेऊन त्या भूमिहीनांना दान केल्या. त्यांची ही भूमिका जगावेगळी आहे. विनोबा भावे आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श मी घेतला. आपल्या ताटातील अर्धी भाकरी दुसऱ्याला देण्याचा. त्यामुळेच स्वत:च्या कमाईतील ४० टक्के कमाई गोरगरिबांवर मी खर्च करतोय. अनेक विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन शिक्षण आणि नोकरीही दिली. गरिबांच्या घरांना मदत, अनेकांना घरे, गाड्या दिल्यात. हीच दातृत्वाची भावना घेऊन यापुढेही असेच आयुष्य जगणार आहे.

गरिबीमुळेच मी राजकारणात आलो. त्यामुळे महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरवला. शेलघर हे आदर्श गाव बनवले. काम करण्याचा उद्देश चांगला असेल तर निश्चितच यश मिळते. 'जनसेवेसी काया झिजवावी', या उक्तीप्रमाणे सामाजिक संस्थांच्या मी कायम मागे आहे. विनोबांच्या स्मृती कायम राहण्यासाठी त्यांच्या नावाने स्वागत कमान उभारली जाईल. खर्चाची जबाबदारी मी घेतो, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यावेळी म्हणाले.

यावेळी सर्वोदय चळवळीचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब नेने, शिवाजीदादा कागणीकर, डॉ. श्रीराम जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, श्रद्धा ठाकूर, वैभव पाटील, मार्तंड नाखवा आणि सर्वोदय चळवळीचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भेंडखळ येथील बीपीसीएल समोर वाहनांच्या रांगा



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण जवळ भेंडखळ गावाजवळ असलेल्या बीपीसीएल कंपनीत गॅस सिलेंडर वाहून नेणाऱ्या गाड्याना सहाय्यक (क्लिनर) असल्याशिवाय कंपनीत प्रवेश बंद केल्यामुळे गॅस सिलेंडर वाहून नेणाऱ्या ट्रक मालकांनी आणि चालकांनी गुरूवारी ( दि ११ ) आपल्या गाड्या बंद ठेवल्या. यामुळे बीपीसीएल कंपनीच्या रस्त्यावर गॅस सिलेंडर वाहून नेणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

केंद्र सरकारने सरकारी प्रकल्पात सहाय्यक (क्लिनर) असल्याशिवाय कोणत्याही वाहनाला प्रवेश देवू नये असा नियम केल्याने बीपीसीएल प्रकल्पात येणाऱ्या गाड्यांना सहाय्यक (क्लिनर) असणे सक्तीचे केले आणि ज्या गाड्यांवर क्लिनर आहे त्यांनाच कंपनीत प्रवेश दिला. मात्र क्लिनर शिवाय नेहमी चालणाऱ्या या चालकांना हा नियम मान्य नाही. त्यांच्या मते क्लिनरचा पगार देण्या ईतके भाडे आम्हाला मिळत नाही. त्या भाड्यामध्ये आम्हाला वाहनाचा खर्च, चालकाचा आणि क्लिनरचा पगार देणे परवडणार नाही त्यामुळे त्यांनी आपल्या गाड्या बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. उरणच्या बीपीसीएल कंपनीत १२ ट्रान्सपोर्टर कंपन्यांना हा वाहतूकीचा ठेका दिला आहे. त्या सर्व वाहतूकदारांनी हा संप पुकारला होता.

ट्रक चालकांच्या या निर्णयामुळे गॅस वितरणा-वर मोठा परिणाम होणार आहे आणि राज्यात गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. याबाबत उरणचे तहसिलदार डॉ उध्दव कदम आणि उरण पोलीस यांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी ताबडतोब बीपीसीएल प्रशासन आणि वाहतूकदार कंपन्यांचे प्रतिनिधी यांच्यात बैठक घडवून आणली. त्यानंतर ट्रक चालकांना ही क्लिनरची सक्ती तातडीने लागू न करता त्याला मुदत देण्यात आली. आणि प्रत्येक ट्रकवर क्लिनर ठेवण्यासाठी मुदत दिली त्यामुळे या वाहतूकदारांनी आपला संप मागे घेतला असल्याची माहिती उरणचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक हनिफ मुलानी यांनी दिली.

### प्रतिष्ठित सवाई गंधर्व महोत्सवात रायगड नवी मुंबईला मानाचे पान

# जागतिक कीर्तीच्या कलाकारांच्या सोबत पं. उमेश चौधरी एकाच व्यासपीठावर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पं. सवाई गंधर्व यांच्या ७३ व्या पुण्यस्मरणानिमित्त कर्नाटक सरकारच्या कन्नड आणि सांस्कृतिक विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या कुंदगोळ येथिल 'संगीत महोत्सवा'त रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांना शास्त्रीय गायनासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या महोत्सवात पद्मश्री एम. वेंकटेश कुमार, पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे, विद्वान द्वारकिश एम., पं. गणपती भट यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या कलाकारांच्या सोबत पं. उमेश चौधरी यांना एकाच व्यासपीठावर गायनाची संधी मिळाली आहे. त्यामुळे रायगड-नवी मुंबईला या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित महोत्सवात मानाचे पान लाभले आहे.

हा महोत्सव दिनांक १५ व १६ सप्टेंबर रोजी कर्नाटकमधील संगीत सम्राट सवाई गंधर्व स्मारक भवन येथे होणार असून, देशभरातील नामवंत गायक-वादकांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.या संगीत महोत्सवाचे उद्घाटन १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता श्री. अदृश्य काडसिद्धेश्वर महास्वामीगलू, जगद्गुरू फकीर सिद्धाराम महास्वामीगलू यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी कर्नाटक राज्याचे ग्राहक संरक्षण व अन्न नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद शिंदे, आमदार एम. आर. पाटील, पत्तन पंचायत अध्यक्ष श्यामसुंदर देसाई, कन्नड आणि सांस्कृतिक विभागाचे सहाय्यक संचालक एम. एस. बेक्केरी यांच्या प्रमुख उपस्थितीत, तसेच सवाई गंधर्व स्मारक विश्वस्त संस्थेचे चेअरमन पद्मश्री डॉ. अरविंद काटगी यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडणार आहे.

या महोत्सवात पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे यांना 'सवाई गंधर्व राष्ट्रीय संगीत पुरस्कार' ने सन्मानित करण्यात येणार आहे. १५ सप्टेंबर रोजी पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे, विदुषी पद्मिनी राव, पं. उमेश चौधरी, पं. क्रिशनेंद्र वाडीकर, पं. रतन शर्मा, पं. अभिषेक जोशी, श्रीकांत देवी व राजेश्वरी पाटील यांचे शास्त्रीय गायन सादर होणार आहे. तसेच विद्वान द्वारकिश एम. व पं. आनंद पाटील यांची कर्नाटकी वीणा-गायन जुगलबंदी आणि हेमंत जोशी यांचे तबलावादन होणार आहे. १६ सप्टेंबर रोजी पद्मश्री एम. वेंकटेश कुमार, पं. गणपती भट, अशोक नाडगीर, वीणा हंगल यांच्यासह अनेक मान्यवर गायक आपले सादरीकरण करणार आहेत. रायगड-नवी मुंबईचे सुपुत्र, रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांना प्रतिष्ठित सवाई गंधर्व संगीत महोत्सवात शास्त्रीय गायनाची संधी मिळणे हा खरोखरच मोठा सन्मान आहे. पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे, पद्मश्री एम. वेंकटेश कुमार, पं. गणपती भट यांसारख्या जागतिक कीर्तीच्या दिग्गज कलाकारांच्या बरोबरीने एकाच मंचावर सादरीकरण करण्याची ही संधी केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर रायगड-नवी मुंबईसाठीही मानाचा क्षण आहे.

# श्रीवर्धन तालुक्यातील अनेक दुर्गम भागामध्ये अद्याप मोबाईल नेटवर्क नसल्यामुळे नागरिकांचे प्रचंड हाल

### शासकीय कामे देखील ठप्प

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुका भौगोलिक दृष्ट्या पाहिल्यास विविध विभागांमध्ये विभागलेला आहे. समुद्र किनारपट्टीची असलेली गावे श्रीवर्धन, दिवेआगर, आदगाव, हरिहरेश्वर, वेळास ही समुद्रा सपाटीवर आहेत. या गावांच्या काही किलोमीटर अंतरावर डोंगर आहेत. परंतु तालुक्यातील अनेक गावे व वाड्या अशा ठिकाणी आहेत की अद्यापही त्या ठिकाणी मोबाईलचे नेटवर्क उत्तम प्रमाणात उपलब्ध होत नाही. पर्यायाने नागरिकांना अत्यंत त्रास सहन करावा लागतो. अनेक गावकरी आपल्या नातेवाईकांना किंवा मुंबईला असलेल्या आपल्या मुलाला फोन करण्यासाठी एक किलोमीटर चालत दूर टेकडीवर जातात, त्यावेळी त्याला नेटवर्क उपलब्ध होते.

तालुक्यातील बोरले, रसाळवाडी, देवखोल, नागलोली, धनगर मलई या गावांमध्ये मोबाईल नेटवर्क अत्यंत कमी प्रमाणात सापडत असल्यामुळे त्या ठिकाणी इंटरनेट सेवा चालत नाही. नागलोली सारख्या गावामध्ये केंद्र शासनाचे पोस्ट ऑफिस कार्यरत आहे. परंतु या पोस्ट ऑफिसचा कारभार करणे देखील नेटवर्कच्या अभावी कठीण होऊन बसते. त्याचप्रमाणे या ठिकाणी असलेले ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी व इतर शासकीय आस्थापना किंवा त्या ठिकाणी काम करणारे कर्मचारी यांना नेटवर्क उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

या परिसरामध्ये धनगर मलई व देवखोल या दोन गावांच्या परिसरात उंच डोंगरावर भारत संचार निगमने मोबाईल टॉवर उभारलेले आहेत. परंतु हे टॉवर कायमच बंद असल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे नागरिकांनी भारतीय संचार निगमगमचे घेतलेले सिम कार्ड कोणतेही उपयोगाचे नसल्याने, जिओ कंपनीचे सिम कार्ड घेतले आहे. परंतु जिओ कंपनीचे नेटवर्क देखील त्या ठिकाणी चांगल्या प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे नागरिकांना फार अडचणीचे होऊन बसते. प्रशासकीय दृष्ट्या सर्व कारभार नेटवरती उपलब्ध होत असल्यामुळे नागरिकांना प्रत्येक भागामध्ये नेटवर्क उपलब्ध करून देणे शासनाची जबाबदारी आहे.

तरी प्रशासनाने या ठिकाणी चांगल्या प्रकारे नेटवर्क सुविधा उपलब्ध होईल. यासाठी त्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या टॉवर्सना पुनर्जीवित करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. जर का भारत संचार निगम कडून त्या ठिकाणी टॉवर सुरू करण्यास उपलब्धता दर्शवण्यात येत नसेल, तर खाजगी कंपनीचा टॉवर उभा करून नागरिकांना सोय करून देणे आवश्यक आहे.



# कामगारांच्या १२ तासांचा निर्णय मागे घेण्याची भारतीय मजदूर संघाची मागणी



**दै.रायगड नगरी । उरण**

राज्य सरकारने कामगारांसाठी जारी करण्यात आलेल्या १२ तास कामाच्या परिपत्रकाचा भारतीय मजदूर संघाने निषेध केला आहे. याबाबत राज्याचे कामगार मंत्री ऍड.प्रकाश फुंडकर यांची भेट घेऊन हा निर्णय मागे घेण्याची मागणी मजदूर संघाने केली आहे.

या निर्णयामुळे कामगार वर्गावर अन्याय होणार असून,त्याचे गंभीर परिणाम होतील.यातून ८ तास काम व ४८ तास आठवड्याची मर्यादा हा कामगारांचा कायद्यातील मूलभूत हक्क हिरावल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कामगार मंत्र्याना दिलेल्या निवेदनात १२ तास कामकाजामुळे कोणते परिणाम होतील याबाबत काही मुद्दे मांडण्यात आले आहेत.दे-शात बेरोजगारीचा प्रश्न आ वासून उभा असतांना अशा प्रकारे कामाचे तास वाढविल्यास किंवा एका व्यक्तीकडून अधिक काम करून घेतल्यास कामाचा दर्जा कमी आणि रोजगाराच्या संधीही कमी होतील.कामगारांवर कामाचा ताण आणि दबाव वाढेल.

यामुळे कारखानदार व ठेकेदारांकडून होणारे शोषण वाढेल.दीर्घकाळ काम केल्यामुळे शारीरिक मानसिक थकवा,अपघाताचे प्रमाण,आजार व अकाली मृत्यूचे प्रमाण वाढण्याचा धोका होईल. कामाचे तास वाढल्यास महिलांना दीर्घकाळ काम करणे अत्यंत कठीण होणार आहे.तसेच कुटुंब, मुले आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळतांना महिलांची तारांबळ उडणार असून परिस्थिती अधिक बिकट होईल.यातून कुटुंबाला वेळ देता न येणे,मुलांच्या शिक्षणावर परिणाम व सामाजिक जीवन धोक्यात येईल,असे मुद्दे मांडण्यात आले.

या वेळी भारतीय मजदूर संघाच्या वतीने प्रदेशातील प्रमुख पदाधिकारी, विविध जिल्ह्यातील कामगार संघटनाचे नेते व संबंधित औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधिंनी आपापली मते मांडली.

कामगारांचे हक्क रोजगाराची हमी आणि कुटुंबियांच्या आरोग्यासाठी आमचा संघर्ष सुरूच राहील, असे सुरेश पाटील राष्ट्रीय सचिव भारतीय मजदूर संघ यांनी सांगितले.

# रोह्यात जनसुरक्षा कायदा विरोधात विरोधकांचा व कष्टकऱ्यांचा एल्गार

**दै.रायगड नगरी । कोलाड**

रेटुन पाशवी बहुमताच्या जोरावर विधानसभेत मंजुर करण्यात आलेला जनसुरक्षा कायदा हा सर्वसामान्य जनतेसाठी कष्टकऱ्यांच्या हक्कावर गदा आणणारा असुन फक्त भांडवलदाराच्या फायदाचा आहे. या कायाद्यामुळे आपण सरकारला प्रश्न पण विचारायला बंधने येणार आहेत.

आंदोलन करण्याच्या मुलभुत हक्कावर गदा आणणारा हा कायदा रद्द केलाच पाहिजे या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्रदेश काँग्रेस चे अध्यक्ष हर्षवर्धनदादा सपकाळ व रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष माननीय महेंद्रशेठ घरत यांच्या आदेशानुसार महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्ष काँग्रेस, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष,राष्ट्रवादी (शरद पवार गट), माकप, भाकप, सर्वहारा जनआंदोलन व भारत जोडो अभियान यांच्यातर्फे जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधी बुधवार दि.१० सप्टेंबर रोजी रोह्यात पदयात्रा काढण्यात आली होती.

या यात्रेत जनतेचा बहुसंख्य प्रतिसाद होता. कष्टकरी जनतेचा ही प्रचंड प्रमाणात सहभाग होता.यावेळी जनसुरक्षा विधेयक कायदा रद्द करा, संविधान बचाव, बचेंगे तो जितेंगे, आपला लढा न्याय हक्कासाठी, अशा घोषणानी सारा परिसर दुमदुमले होते या प्रसंगी सर्व आंदोलनकर्त्यानी मोर्चा काढल्यावर तहसीलदारांना निवेदन दिले. याप्रसंगी रोहा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनिलदादा देशमुख, सर्वहारा जनआंदोलनाचे रायगड जिल्हा अध्यक्ष सोपानजी सुतार, वाघमारे, तसेच शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख नितिन वारंगे, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष तुषार खरिवले, कोलाड विभाग काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हरिओमभाऊ टाळकुटे, रोहा तालुका काँग्रेस अल्पसंख्याक सेल अध्यक्ष फैसलभाई अधिकारी, रोहा तालुका पर्यावरण सेलचे अध्यक्ष मारुती दादा फाटक यांसह अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते

# पेणमध्ये जनसुरक्षा कायद्या विरोधात सर्वपक्षीयांकडून सह्यांची मोहीम

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक २०२४ राज्य सरकारने हा कायदा विधिमंडळाच्या अधिवेशनात बहुमताच्या जोरावर पारित केला असला तरी हा कायदा जनतेसाठी तसेच घटनाविरोधी आणि लोकशाहीस बाधक असल्याने या जनसुरक्षा कायद्याविरोधात आज राज्यभर आंदोलन होत असताना पेणमध्ये सुद्धा सर्वपक्षीयांकडून नगरपालिका चौकात सह्यांच्या मोहिमेद्वारे आंदोलन करण्यात आले.




यावेळी ठाकरे गटाचे प्रसाद भोईर यांनी सांगितले की केंद्रासह राज्यातील सरकार जनतेच्या हिताची कामे न करता त्यांना वेटीस धरण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून करत असून सरकारच्या या धोरणाला जनता आता कंटाळलेली आहे.त्यामुळे परीत केलेला जनसुरक्षा कायदा हा जनतेच्या हक्कांची गळचेपी करणारा असल्याचे त्यांनी सांगितले.

या आंदोलनाला काँग्रेस नेत्या नंदा म्हात्रे, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, सामाजिक कार्यकर्त्या वैशाली पाटील, संतोष ठाकूर, तालुकाप्रमुख समीर म्हात्रे, जगदीश ठाकुर, शहर प्रमुख सुहास पाटील, कासू विभाग प्रमुख गजानन मोकल, शेकापचे ड.रोशन पाटील, काँग्रेस तालुकाध्यक्ष अशोक मोकल, शहराध्यक्ष प्रवीण पाटील, राष्ट्रवादी (श.प.गट) प्रकाश मोकल सूर्यकांत पाटील, योगेश पाटील, विनोद म्हात्रे, संदीप रेणुका पाटील, रवींद्र मोकल, हिराजी चौगले, निलेश म्हात्रे, हिदु कुवारे आदिंसह सर्वपक्षीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी अनेकांकडून जनसुरक्षा विरोधात सह्या करण्यात आल्या